शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

*परिपत्रक*

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना आदेशान्वये कळविणेत येते की, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने **बुधवार दि. ३१ मे, २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीमधील पोर्चमध्ये "अहिल्यादेवी होळकर" यांच्या जयंतीनिमित्त** प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. याप्रसंगी **"अहिल्यादेवी होळकर"** यांच्या प्रतिमेस मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते व मा. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मा. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग डॉ. पी. टी. गायकवाड यांचे उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्याचा समारंभ आयोजित केलेला आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनींनी या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे.

Mahajan

प्र. संचालक
सामाजिक वंचितता व समावेशक
धोरण अभ्यास केंद्र,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

जा.क्र./शिवाजी वि./सामाजिक वंचितता अभ्यास केंद्र/जयंती/२०२३/०१
दि. 25 MAY 2023

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी.
२. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव.
४. सर्व रेक्टर यांनी सदरचे परिपत्रक वसतिगृहातील नोटीस बोर्डवरती लावण्याची व्यवस्था करावी
५. अभियांत्रिकी विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता व इतर व्यवस्था करण्यात यावी.
६. उद्यान विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी कुंडया ठेवण्यात याव्यात
७. जमादार यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक टेबल स्टूल उपलब्ध करून दयावे व कार्यक्रमाच्यावेळी मदतीसाठी एक शिपाई देण्यात यावा
८. सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या निर्दशनास आणावे.
९. इंटरनेट विभागाने सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.